# विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळावर डॉ. राजेश्वर दुडूकनाळे



डॉ. दुडूकनाळे

नवीन नांदेड, ता.२१ (बातमीदार) : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळावर सांस्कृतिक व विद्यार्थी कल्याण कार्यक्रम समन्वयक म्हणून डॉ.राजेश्वर दुडूकनाळे यांचे नुकत्याच झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत नामनिर्देशन करण्यात आले आहे. डॉ. राजेश्वर दुडूकनाळे हे देगलूर महाविद्यालय, देगलूर येथे मराठी विभागात सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायद्यानुसार सांस्कृतिक व विद्यार्थी कल्याण कार्यक्रम समन्वयक व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नियुक्त केले जातात. त्यानुसार डॉ. दुडूकनाळे यांचे सांस्कृतिक व विद्यार्थी कल्याण कार्यक्रम समन्वयक म्हणून पाच वर्षासाठी नामनिर्देशन करण्यात आले आहे.

यापूर्वी त्यांनी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक म्हणून कार्य केले आहे. सुमारे पावणेचार वर्षाच्या कार्यकाळात त्यांनी सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. तसेच विद्यापीठाच्या विविध समित्यावर त्यांनी काम केले आहे. त्यांच्या या अनुभवाचा फायदा विद्यापीठास येणाऱ्या पाच वर्षात नक्कीच होणार आहे.

त्यांच्या या निवडीबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले, व्यवस्थापन परिषेदेचे सदस्य डॉ.नरेंद्र चव्हाण, डॉ. सूर्यकांत जोगदंड, डॉ.डी.एन. मोरे, डॉ. सुरेखा भोसले, नारायण चौधरी, हनमंत कंधारकर आदींनी अभिनंदन केले आहे. अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, सचिव शशिकांत चिद्रावार, प्राचार्य डॉ. मोहन खताळ, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

Scanned with OKEN Scanner